जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०१०/२०२३
## दि.०५/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १६१/२०२३,भादविक ३९२,३९४,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३० वर्षे,रा.कोरेगाव पार्क,पुणे |
| **आरोपीत** | कार मधील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/१०/२०२३ रोजी रात्री ०८/०० ते ११/३० वा.चे दरम्यान सॅण्डविच एक्सप्रेस दुकानाचे समोर,लेन नं.६,कोरेगाव पार्क,पुणे ते चाकण दरम्यान कार प्रवासा मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांना इन्स्टाग्रामवरुन संपर्क करुन,त्यांचे भविष्य पाहण्याचे बहाण्याने त्यांचे कार मधुन नमुद ठिकाणी घेऊन जाऊन,त्यांना चाकु व फायटरचा धाक दाखवुन,शिवीगाळ व हाताने मारहाण करुन फिर्यादी यांचे मोबाईल मधील पेटीएमचा पासवर्ड घेऊन त्यांचे बँकेचे खात्यातुन एकुण रक्कम ९५,००१/-रुपये जबरदस्तीने ट्रान्सफर करुन व सदरबाबत कोणास काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. (फिर्यादी यांनी त्यांचे नातेवाईक यांचेशी चर्चा करून आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, दत्तात्रय लिंगाडे ९७६७१००८१२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४७५/२०२३,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | नारायण राठोड,वय-३० वर्षे,रा.वडगाव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/१०/२०२३ रोजी १)१४/३० ते १६/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.१४,रागिणी विहार सोसायटी,ए-विंग,दांगट पाटीलनगर,स.नं.६०/२/२,वडगाव-बुद्रुक,पुणे २)दिनांक ०५/१०/२०२३ रोजी सकाळी ०९/०० ते १७/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.१३,रागिणी विहार सोसायटी,ए-विंग, दांगट-पाटीलनगर,स.नं ६०/२/२,वडगाव बुद्रुक,पुणे ३)दिनांक ०५/१०/२०२३ रोजी दुपारी १२/०० ते १८/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.१६,रागिणी विहार सोसायटी,बि-विंग,दांगट पाटील नगर,स.नं ६०/२/२,वडगाव-बुद्रुक,पुणे या तीन्ही फ्लॅट मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट नं.१४ हा कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने असा १,६१,०००/- रु किमतीचा ऐवज तसेच इतर साक्षीदार २.किशोर आहेर यांचे फ्लॅट नं.१३ मधुन ८०००/- रु किचे चांदीचे दोन मेडल, ३.सिद्धेश धुमाळ यांचे फ्लॅट नं.१६ मधुन २२,०००/- रु किचे सोन्या-चांदीचे दागिने असा सर्व मिळुन एकुण १,९१,०००/- रुपये किंमतीचा ऐवज दिवसा तीन्ही फ्लॅट मधुन घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पाटील ९९२२२१०११० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६७६/२०२३,भादविक ३९४,३४१ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२०,रा.रामनगर,येरवडा,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम वय अंदाजे ३२ वर्षे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०२३ रोजी सकाळी ०६/५० वा.कॅनरा बँक एटीएमचे समोर,भाजी मंडई,रामनगर, येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह राहते घरातुन कामावर जाण्यासाठी दुचाकीवरून जात असताना,सदर ठिकाणी यातील नमुद एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांची मोटर सायकल अडवुन,कुठे चाललात,का चाललात,तुमची आयडी दाखवा असे म्हणुन फिर्यादीस हाताने मारून व रस्त्याच्या बाजुला पडलेल्या बांबुने फिर्यादी यांना मारहाण करून, त्यांचे खिशातील गाडीचा हप्ता देण्यासाठी ठेवलेले ५,३००/- रुपये रोख रक्कम जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे ९८२३५५६७१३ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १५०७/२०२३,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२६ वर्षे,रा.गंगानगर,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपीत** | १.एक महिला व तीचे आई-वडील (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे सप्टेबंर २०२३ ते दि.०३/१०/२०२३ रोजीपर्यत महिला हिचे राहते घरासमोर रुपी कॉलनी, मोरेश्वर कॉलनी,भेकराईनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची पती गणेश तानवडे वय-२७ वर्षे यांना त्यांचे ओळखीची यातील नमुद आ.क्र.१ हिने व तीचे आई-वडील यांनी आपसात संगनमत करून,गणेश तानवडे यांना आ.क्र.१ हिचे ओळखीचा फायदा घेवुन,त्यांचेकडे पैशाची मागणी करून,तीस अजुन पैसे पाहिजे असल्यामुळे,पैशाकरीता वेळोवेळी मानसिक त्रास देवुन,त्यांनी पैसे न दिल्यास त्यांना खोटया पोलीस केस मध्ये अडकविण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादी यांचे पती गणेश यांचेकडील दोन मोबाईल स्वतःकडे ठेवुन घेवुन,त्यांना तीचा शारिरीक व मानसिक त्रास देवुन,आ.क्र.१ हिचे राहते घराच्या बाहेर जीन्या मध्ये गणेश तानवडे यांना साडीचे सहायाने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. तृप्ती खळदे ७३५०४२१९६१ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६३९/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मोवाका कलम ११९/१७७ |
| **फिर्यादी** | पुंडलीक कांबळे,वय ६०वर्षे,रा.जनता वसाहत,पर्वती,पुणे |
| **आरोपीत** | ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा. सम्राट सार्थक बिल्डिंग समोर पुणे-सातारा रोड कात्रज,पुणे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा राजेश कांबळे हा त्याचे दुचाकीवरुन मांगडेवाडी येथुन कात्रज चौक दिशेने जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार राजेश कांबळे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | श्रेणी पो.उप.निरी. मोहन देशमुख ९७६५३९०९४३ |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे १०२/२०२३,भादविक ३८४,३८५,३८७,३४१,३७९,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२३ वर्षे,रा.डोणेजे,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | १.अमोल परशुराम रायकर,वय-३० वर्षे,धंदा-व्यवसाय,रा-कॅनल जवळ,भैरवनाथ नगर,कोंढवे-धावडे,ता.हवेली,जि.पुणे २.सोमनाथ उद्धव कोमीले,वय-३२ वर्षे,रा.गोसावी वस्ती,राम नगर, वारजे-माळवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिंनाक ०३/१०/२०२३ ते ०५/१०/२०२३ रोजीचे कालावधीत कोपरेगाव,कोढंवे-धावडे,शिवणे,पुणे या परिसरात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे गॅस सप्लायर्स कामगार असुन,कोपरेगाव,कोढंवे-धावडे,शिवणे,पुणे या परिसरातील एकुण ०५ गॅस एजन्सीच्या डिलेव्हरी बॉय यांना यातील नमुद इसमांनी आप-आपसात संगनमत करून, गॅस सिलेंडर वाहतुकीच्या गाडया अडवुन,त्यांना व त्यांचे मालकांना |

| | |
|---|---|
| | शिवीगाळ व दमदाटी करुन,त्यांच्यावर खोटे आरोप लावुन,फिर्यादी यांचे कोपरेगाव,पुणे येथे ३,३००/- रुपये किचा एच.पी.गॅस कंपनीचा घरगुती वापराचा सिलेंडर चोरी करुन,फिर्यादी व त्यांचे मालकांना शिवीगाळ व दमदाटी करुन त्यांचेकडुन १५,०००/- रुपये दर महिन्याला खंडणी स्वरूपात मागणी करुन,फिर्यादी यांचेकडुन ५,०००/- रुपये रोख रक्कम घेतली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, दादाराजे पवार ७०२०५८३०७८ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २५६/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५० वर्षे,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/१०/२०२३ रोजी दुपारी १३/०० वा.ते १४/०० वा.चे दरम्यान पुणे-सातारा रोडवरील शंकर महाराज मठाचे समोर रॉयल आर्केड सोसायटीतील श्री.हरी व्हेज या हॉटेलचे गेट समोर फुटपाथवर पार्क केलेल्या फिर्यादी यांचे मोपेडचे डिक्कीतुन बालाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी सदर ठिकाणी त्यांची मोपेड पार्क करून ठेवली असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे मोपेडची डिकी उघडुन,डिकीत ठेवलेले लेदरचे पाकीटातील ५,०००/- रुपये रोख रक्कम व सोन्याचा हार असा एकुण १,२५,०००/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, एस.एस.फरांदे ८८८८८२८००९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**